# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २१७–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| सरपंच, श्री. बाबासाहेब अर्जुन टेंगळे,<br>ग्राम पंचायत कोसारी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, जत , जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>**कोरम**</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सरपंच, ग्राम पंचायत, कोसारी यांनी आपले प्रतिनिधी श्री. हरिभाऊ दिगंबर खापरे यांचेमार्फत मंचामध्ये अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे कलम ६.१० नुसार वितरण कंपनीविरुध्द दि. २८.९.२०१० ला तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

सरपंच, ग्राम पंचायत, कोसारी, ता. जत यांनी आपल्या ग्राम पंचायत हद्दीत रस्त्याकडेने वाढीव दिव्यांसाठी मंजुरी मिळावी यासाठी वितरण कंपनीकडे रितसर अर्ज दि. १६.३.२०१० रोजी दिलेला आहे. वितरण कंपनीने कृती मानके विनियमानुसार दि. १५.४.२०१० पर्यंत चलन देणे आवश्यक होते. त्यानंतर ग्राहकाने अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ४६५ दि. ६.९.२०१० रोजी दाखल केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. १०१९५ दि. १३.९.२०१० ला पारीत झाला त्यामध्ये वि.प.ला कृती मानके साध्य करण्यात अपयश आल्यास ग्राहकास भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

वितरण कंपनीने अपल्या दि. २९.१०.२०१० च्या लेखी अहवालात संरपंच, ग्राम पंचायत, कोसारी यांनी शेतीपंप कनेक्शनसाठी दि. १६.३.२०१० ला अर्ज दिला असल्याचे व त्यांना चलन दि. ११.१०.२०१० रोजी चलन देण्यात आल्याचे म्हटले आहे.

प्रस्तुत तक्रारीच्या मंचासमोरील सुनावणी पूर्वी तक्रारदार ग्राहकाचा मंचाला अग्रेषित केलेला दि. २८.१०.२०१० चा अर्ज मंचामध्ये दि. ९.११.२०१० रोजी प्राप्त झाला. त्यामध्ये सरपंच, ग्राम पंचायत कोसारी यांनी दि. ११.१०.२०१० ला चलन मिळालेमुळे तक्रार दूर झाली असून तक्रार अर्ज रद्द करावा अशी मंचाला विनंती केली आहे. त्या अर्जावर सदरचे काम कागदपत्र पूर्ततेनंतर ४ महिन्यामध्ये पूर्ण करुन देत आहोत, तरी दंड माफ करणेत यावा असे सहाय्यक अभियंता, जत उप विभाग यांनी लिहून दिले आहे त्यांस ग्राहक प्रतिनिधी यांनी प्रस्ताव मान्य असल्याचे लिहून दिले आहे. मंचासमोर अर्ज देणाऱ्या व्यक्तीचे निवडणूक ओळख पत्र क्र. अेक्यू . बी ००६९१२७ दि. ९.११.२०१० ला पाहिले.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. १०.११.२०१० ला घेण्यात आली. त्यावेळी ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी सरपंच, ग्राम पंचायत, कोसारी यांनी दि. १६.३.२०१० ला ग्राम पंचायत हद्दीतील वाढीव दिव्यांसाठी वि.प.कडे अर्ज दिला त्याची प्रोसेसिंग फी भरुन घेतली नाही. वि.प.तर्फे दि. ११.१०.२०१० चलन दिले आहे असे सांगितले. श्री. खापरे यांनी सुरुवातीला ग्राहकाच्या अर्जावर प्रस्ताव मान्य आहे असे लिहून दिले. त्यानंतर मंचासमोर एकाची सरपंच असल्याची ओळख करुन दिली. त्यांनी प्रस्तुतच्या अर्जावर सही नाकारली व यावर लेखी म्हणणे देतो असे सांगून मुदत मागून घेतली. दि १०.११.२०१० ते १८.१२.२०१० दुपारी ४.० वाजेपर्यंत ग्राहकाचा कुठल्याही प्रकारचा अर्ज अथवा लेखी म्हणणे किंवा ग्राहक प्रतिनिधी यांचा अर्ज मंचासमोर प्राप्त झाला नाही. वि.प.तर्फे लोड एक्स्टेंशनचे काम आहे असे सांगण्यात आले. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

मुद्दा क्र. १ : तक्रारदार ग्राहक हे मागणी केल्याप्रमाणे चलन मिळण्याच्या विलंबापोटी वि.प.कडून भरपाई मिळण्यास हक्कदार आहेत काय ?

उत्तर : होय

आदेश ?

खालील प्रमाणे

तक्रारदार ग्राहकांच्या दि. २८.१०.२०१० च्या तक्रार निकाली काढण्याच्या अर्जामुळे भरपाईबद्दल वेगळे आदेश देण्यात आले नाहीत.

<u>कारणमिमांसा</u>

सरपंच, ग्राम पंचायत, कोसारी यांनी वि.प.कडे दि. १६.३.२०१० ला ग्राम पंचायत हद्दीतील रस्त्याकडेने वाढीव दिव्यांच्या मंजुरीसाठी अर्ज केल्याचे वि.प.स मान्य आहे. ग्राहकाने प्रोसेसिंग फी भरली नाही असे दिसते, पावती जोडली नाही किंवा वि.प.ने त्याबद्दल कुठलाही ऊहापोह केला नाही, मान्यता किंवा नकार सांगितला नाही. ग्राहकास दि. ११.१०.२०१० ला चलन देण्यात आले आहे.

चलन मिळाल्याबद्दल दुमत नाही. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी दि. १०.११.२०१० ला मंचासमोर वरील प्रस्ताव मान्य आहे असे लेखी ग्राहकाच्या दि. २८.१०.२०१० च्या अर्जावर लिहून दिले आहे.

दि. १०.११.२०१० रोजी मंचासमोरील घटनाक्रम विचारात घेतला असतां, एका व्यक्तीला सरपंच, ग्राम पंचायत, कोसारी म्हणून तक्रारदार प्रतिनिधींनी मंचासमोर आणले त्या व्यक्तीने अर्जावर सही केली नाही, वेगळा अर्ज किंवा लेखी म्हणणे देणार असे सांगितले. परंतु १ महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही असा अर्ज किंवा लेखी म्हणणे मंचासमोर दिले नाही. अशा परिस्थितीत ग्राम पंचायत, कोसारीच्या वतीने सरपंच यांच्यावतीने मंचाला अग्रेषित केला तक्रार निकाली काढण्याबाबतचा अर्ज ग्राह्य धरता येईल असे मंचाचे मत आहे. तक्रार निकाली काढल्यामुळे चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी मागे घेतल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर होय असे दिले तरी भरपाईबद्दल वेगळे आदेश वि.प.स देणे संयुक्तिक होणार नाही. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदारांच्या दि. २८.१०.२०१० मंचाला अग्रेषित केलेल्या अर्जानुसार व त्यांस ग्राहक प्रतिनिधी यांनी दि. १०.११.२०१० ला मान्यता दिल्याने तक्रार निकाली काढण्यात येत आहे. त्याचप्रमाणे विलंबापोटी भरपाईची मागणी निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.